लोकमत

# शिवाजी विद्यापीठ लोकवाद्यवृंद स्पर्धेत प्रथम

## राज्य युवा महोत्सव; मुंबई विद्यापीठाला विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** येथील गोंडवाना विद्यापीठात आयोजित १७ व्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सवात सर्वाधिक ८३ गुण प्राप्त करून मुंबई विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद, तर ५२ गुण प्राप्त करून सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणेच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले. शिवाजी विद्यापीठाने 'लोकवाद्यवृंद' स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. अभिनेता श्रेयश तळपदे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

२ ते ६ डिसेंबर या कालावधीत झालेल्या या महोत्सवात राज्यभरातील २० विद्यापीठांच्या ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत कलांची उधळण केली.

## विविध स्पर्धांमध्ये प्रथम आलेली विद्यापीठे

- मुंबई विद्यापीठ - वक्तृत्व, भारतीय शास्त्रीय तालवाद्य, भारतीय शास्त्रीय स्वरवाद्य, पाश्चिमात्य एकल गायन, मूकनाट्य, नाटुकल, भारतीय शास्त्रीय नृत्य व लोकनृत्य.
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ - चित्रकला, माती शिल्पकाम, भारतीय सुगम संगीत गायन व भारतीय समूहगीत.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद - पोस्टर, कोलाज, व्यंगचित्र, वादविवाद व एकांकिका.
- वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठ परभणी - रांगोळी.
- श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई - स्थळचित्र.
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ - प्रश्नमंजुषा.
- शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर - लोकवाद्यवृंद.
- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ - पाश्चिमात्य समूहगीत गायन.
- महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी - सांस्कृतिक मिरवणूक.

## फिरत्या चषकाचे मानकरी

- ललित कला विभागाचे सर्वसाधारण जेतेपद औरंगाबाद विद्यापीठाने पटकाविले, तर साहित्य, संगीत, नाट्य, नृत्यविभागाचे सर्वसाधारण विजेतेपद मुंबई विद्यापीठाने पटकाविले.
- मुंबई विद्यापीठाचा सुजेश मेनन याला 'गोल्डन बॉय' म्हणून तर मुंबई विद्यापीठाचीच सानिका पाचभाई हिला 'गोल्डन गर्ल' म्हणून गौरविले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाची घोडदौड कायम

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धा : देवी अहिल्या विद्यापीठाचा केला पराभव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भोपाळ (मध्यप्रदेश) येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने शुक्रवारी इंदोरच्या देवी अहिल्या विद्यापीठाचा २-१ असा पराभव केला.



**भोपाळ (मध्यप्रदेश) येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने सलग तिसरा विजय नोंदवत स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली आहे. प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरेसह संघातील खेळाडू**

शिवाजी विद्यापीठ संघाने या स्पर्धेत प्रथम, आर. के. विद्यापीठ, राजकोटचा १०-० असा एकतर्फी, तर दुसऱ्या सामन्यात गुजरातच्या गांधीनगर क्रीडा विद्यापीठाचा २-१ असा पराभव केला; तर तिसऱ्या सामन्यात इंदोरच्या देवी अहिल्या विद्यापीठाचा २-१ असा पराभव केला. या सामन्यात २० व्या मिनिटाला इंदोरकडून विश्वप्रताप भाटी याने पहिल्या गोलची नोंद केली. यानंतर शिवाजी विद्यापीठाचा कर्णधार राहुल पाटील, प्रतीक बदामे, प्रथमेश हेरेकर, दिग्विजय सुतार यांनी खेळात सुसूत्रता आणत आक्रमण वाढविले. सामन्याच्या २८ व्या मिनिटाला इंदोरच्या बचावफळीतील खेळाडूच्या हाताला गोलक्षेत्रात चेंडू लागल्याने शिवाजी विद्यापीठ संघाला पंचांनी पेनल्टी बहाल केली.

यात अरबाज पेंढारी याने गोल करीत सामना १-१ असा बरोबरीत आणला. उत्तरार्धात डाव्या बगलेतून बदामेने दिलेल्या पासवर प्रथमेश हेरेकर याने गोल करीत सामन्यात संघाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. हीच आघाडी कायम ठेवत शिवाजी विद्यापीठाने सामना जिंकत उपांत्य फेरी गाठली. आज, शनिवारी शिवाजी विद्यापीठ संघाचा डॉ. एच. एस. गौर विद्यापीठ, सागर (मध्यप्रदेश) या संघाबरोबर सामना होणार आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांचे माहितीकरिता या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, **मौजे पाचगांव**, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील **रि.स.नं. १२५/५** पैकी बिगरशेती

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळविणेत येते की, जिल्हा कोल्हापूर, ता. करवीर येथील मौजे शिंगणापूरमधील, शिंगणापूर ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. ९९/७ मधील निवासी कारणासाठी बिगरशेती झालेला प्लॉट नं. १ याचे एकूण क्षेत्र

लोकमत

# विद्यापीठात आज 'सशस्त्रसेना ध्वजदिन'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, शहीद जवान स्फूर्ती केंद्र आणि छत्रपती संभाजीराजे फौंडेशनच्या वतीने आज, शनिवारी विद्यापीठातील दीक्षान्त सभागृहात 'सशस्त्र सेना ध्वज दिना'चा कार्यक्रम होईल. त्यात देशभक्तिपर आधारित स्पर्धातील विजेत्यांना खासदार संभाजीराजे, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, ब्रिगेडियर गोविंद कलवड यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात येईल, अशी माहिती प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, फौंडेशनचे शहाजी माळी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डी. के. गायकवाड, आदी उपस्थित होते.

# आंबेडकर यांच्या मूलमंत्राचे कालसापेक्ष आकलन व्हावे

## कुलगुरु : विद्यापीठात महापरिनिर्वाण दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या डॉ. आंबेडकर यांनी दिलेल्या मूलमंत्राचे कालसापेक्ष आकलन करून तो व्यवहारात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे मत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठात महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने केले होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जातिअंताचा विचार आणि लेखन यांतून त्यांनी केलेली तात्त्विक मांडणी आजही मार्गदर्शक आहे. त्यांच्या स्वप्नातील भारत साकारायचा असेल तर तरुणांनी बाबासाहेबांच्या विचारांचा आणि त्यांच्या संविधानाचा आधार घ्यावाच लागेल, अशी मांडणी प्रा. डॉ. जगन कराडे यांनी केली. प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी भारताची सध्याची आर्थिक परिस्थिती, डॉ. आंबेडकर यांचे आर्थिक विचारांचे आजच्या स्थितीसंदर्भातील महत्त्व याचे सखोल विवेचन केले. जगातील लोकशाही



शिवाजी विद्यापीठात महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित आदरांजली सभेत कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोर असे नतमस्तक झाले.

विचाराला मानवी कल्याणाचे भान देण्याचे कार्य आंबेडकर यांनी केले, असे मत केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी व्यक्त केले.

अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन, डॉ. श्रीपाल गायकवाड यांनी आभार मानले. सुशांत पंडित, विक्रम कांबळे यांनी संयोजन केले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आय.क्यू.ए.सी.चे संचालक प्रा. डॉ. आर. के. कामत, प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. पी. डी. पाटील, आनंद खामकर कमलाकर जाधव, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2010
लोकसत्ता

# स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान अभ्यासायला हवे - शिंदे

**वार्ताहर, वाई**

**भारतीय स्वातंत्र्य** चळवळीतील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान नव्या पिढीने अभ्यासायला हवे. देशाला स्वातंत्र्य मिळवताना आणि स्वातंत्र्य मिळवलेला देश एकसंध ठेवत तो विकासाच्या दिशेने नेण्यात बाबुराव जंगम गुरुजींसारख्या व्यक्तींचे योगदान नव्या पिढीने अभ्यासायला हवे, असे प्रतिपादन बाबुराव शिंदे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघटनेच्या (सुटा) कार्यालयात बाबुराव जंगम गुरुजींच्या ९५ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन सभेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या वेळी विजय मांडके, दत्तोबा शिंदे उपस्थित होते. स्वातंत्र्यसैनिकांवर प्रभाव टाकणाऱ्या गांधीजींच्या जीवनातील अनेक प्रसंगांचा मागोवा घेऊन शिंदे म्हणाले, की नाना पाटील, वसंतदादा पाटील, नागनाथअण्णा, किसन वीर, जी डी बापू क्रांतिकारकांची साहसी कृत्ये आपल्याला अचंबित करतात. साताऱ्च्या गिल्बर्ट सारख्या निष्ठुर इंग्रज पोलीस अधिकाऱ्याच्या ताब्यातून बंदुका पळवून आणण्याचे जंगम गुरुजींचे कृत्यही याच साहसी मालिकेत शोभणारे ठरते.

साताऱ्याच्या प्रतिसरकारच्या चळवळीचे स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्व अनन्यसाधारण आहे, असे सांगून ते म्हणाले, की या चळवळीच्या स्मृती स्मारक रूपात जतन करण्याच्या रेंगाळलेल्या कामाला गती देण्यासाठी नव्या सरकारकडे आणि ज्येष्ठ नेते शरद पवार, पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे पाठपुरावा करण्याची गरज आहे. याप्रसंगी कॉ माणिक अवघडे, डॉ. रवींद्र भारती, बळिराजा संघटनेचे गौतम भोसले, विजय निकम, डॉ. शंकरराव मोरे यांची भाषणे झाली. सुरेश कांबळे (जैतापूर) यांनी जंगम गुरुजी गौरव गीत सादर केले. विजय मांडके यांनी प्रास्ताविक केले. शिरीष जंगम यांनी आभार मानले.

# समाजशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषद मंगळवारपासून

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त १० ते १२ डिसेंबर या कालावधीत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी', या मध्यवर्ती विषयावर ही परिषद होणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये सकाळी साडेदहा वाजता ज्येष्ठ संशोधक आणि मानवी हक्क कार्यकर्त्या प्रा. गेल ऑम्वेट यांच्याहस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोग आणि भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे (आयसीएसएसआर) माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांचे बीजभाषण होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रशियन सोसायटी ऑफ सोशिओलॉजिस्ट, साऊथ आफ्रिकन सोशिओलॉजिकल असोसिएशन, इंटरनॅशनल सोशिओलॉजिकल असोसिएशन, ब्रीक्स नेटवर्क्स ऑफ सोशिओलॉजी, एशियन क्लायमेट चेंज एज्युकेशन सेंटर, साऊथ कोरीया आणि ईंडियन सोशिओलॉजिकल सोसायटी या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहभागाने ही परिषद होत आहे. या परिषदेत १५ ते १६ देशांतील समाजशास्त्रविषयक अभ्यासक, प्राध्यापक, संशोधक विचार मांडणार आहेत. तीन दिवसांत १८ सत्रांमध्ये होणाऱ्या परिषदेत भारतासह १५ देशांतील विविध विद्यापीठांतील ७० तज्ज्ञ आणि विविध विद्यापीठांचे ८ माजी कुलगुरू सहभागी होणार आहेत. यामध्ये माजी कुलगुरु प्रा. डॉ. विद्युत जोशी, हेमिक्सा राव, हरी बाबू, के. एल. शर्मा, जोगन शंकर, बी. सी. बारिक, अरविंद अग्रवाल आणि समीता मन्ना यांचा समावेश आहे.

परिषदेदरम्यान ९० पेक्षा अधिक शोधनिबंधांचे सादरीकरण, चर्चा व सामाजिक प्रवाहांशी निगडीत ३४ पैलूंची मांडणी या परिषदेत होणार आहे. विशेषतः 'प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान', भारतीय समाजशास्त्राच्या अध्ययन आणि अध्यापनास यावर्षी शंभर वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर 'भारतीय समाजशास्त्राचा शंभर वर्षांचा प्रवास', यावर विशेष व्याख्याने आणि परिषदेस काही कारणांनी ज्यांना उपस्थित राहता येत नाही, त्यांच्यासाठी विद्यापीठात पहिल्यांदाच ईसेशनही होणार असून, यामध्ये परदेशी समाजशास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे आर्थिक सहकार्य परिषदेला लाभले आहे. परिषदेचा समारोप १२ डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता बिहारमधील मोतिहारी येथील महात्मा गांधी केंद्रीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. अरविंद अग्रवाल यांच्या उपस्थितीत होणार आहे. भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे (आयसीएसएसआर) संचालक प्रा. उपेंद्र चौधरी, प्रा. अजय गुप्ता हे उपस्थित राहणार आहेत.

पत्रकार परिषदेस प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी उपस्थित होते.

## सुवर्णमहोत्सव साजरा करणारा देशातील दुसरा विभाग

देशातील विद्यापीठांमध्ये सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या समाजशास्त्र अधिविभागांत केरळ विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ ही दोनच विद्यापीठे आहेत. केरळ विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागानेही विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील प्रवाहांबाबत अभ्यासू मांडणी केली आहे. याच धर्तीवर शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाने पहिल्या बॅचमधून उत्तीर्ण झालेल्या सत्तरीतील दहा विद्यार्थ्यांचा सत्कार केला. देशाच्या कानाकोपऱ्यात स्थायिक असलेल्या माजी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून विभागाचा सुवर्णमहोत्सव साजरा केला जाणार आहे.

## तीन दिवस ३४ विषयांवर होणार सखोल चर्चा

# शिवाजी विद्यापीठाची विजयी घोडदौड

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

भोपाळ (मध्य प्रदेश) येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने शुक्रवारी झालेल्या सामन्यात इंदोरच्या देवी अहिल्या विद्यापीठावर २-१ अशा गोल फरकाने विजय मिळवला. शिवाजी विद्यापीठाचा हा तिसरा विजय असून, या पूर्वीच्या पहिल्या सामन्यात राजकोटच्या आर. के विद्यापीठाचा १० -० असा धुव्वा उडवला आहे. दुसऱ्या अटी-तटीच्या सामन्यात गुजरातच्या गांधीनगर क्रीडा विद्यापीठाचा २-१ ने पराभव केला.

शुक्रवारी झालेल्या चुरशीच्या सामन्यात पूर्वार्धात २०व्या मिनिटाला इंदोरकडून विश्वप्रताप भाटी याने पहिल्या गोलची नोंद केली. गोलची परतफेड करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने आक्रमक धोरण स्वीकारले. कर्णधार राहूल पाटील, प्रतीक बदामे, प्रथमेश हेरेकर, हांडे, दिग्वीजय सुतार यांनी खेळात सुसूत्रता आणून आक्रमण वाढवले. सामन्याच्या २८व्या मिनिटाला इंदोरच्या बचाव फळीतील खेळाडूने डी मध्ये चेंडू हाताळल्याने पंचांनी शिवाजी विद्यापीठाला पेनल्टी बहाल केली. आरबाज पेंढारीने

## आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धा

पेनल्टीद्वारा गोल करून सामना १-१ असा बरोबरीत आणला. उत्तरार्धातही खेळावर शिवाजी विद्यापीठाची छाप होती. ६८ व्या मिनिटाला शिवाजी संघाने सुरेख चाल रचली. डाव्या बगलेतून प्रतीक बदामेच्या मिळालेल्या पासवर प्रथमेश हेरेकरने मैदानी गोल करून सामन्यात आघाडी मिळवून दिली. पूर्ण वेळेत एक गोलची आघाडी कायम ठेवत शिवाजी विद्यापीठाने सामना जिंकला. शनिवारी (ता. ७) गटातील उपांत्य सामना डॉ. एच. एस. गौर विद्यापीठ, सागर (मध्य प्रदेश) या संघाबरोबर होणार आहे.

# प्रतिमापूजन, व्याख्यान, गीतगायन

## महापरिनिर्वाणदिनी डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६३ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरासह जिल्ह्यात सरकारी कार्यालये, विविध संस्था आणि संघटनांनी डॉ. आंबेडकर यांना अभिवादन केले. यानिमित्ताने डॉ. आंबेडकर यांच्या आठवणी आणि विचारांना उजाळा देण्यात आला.

लोकजनशक्ती पार्टीच्या वतीने महापौर ॲड. सुरमंजिरी लाटकर, आमदार चंद्रकांत जाधव, आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हाधिकारी दौलत देसाई, शहर पोलिस उपअधीक्षक प्रेरणा कट्टे, समाजकल्याणचे सहायक आयुक्त बाळसाहेब कामत, लोक जनशक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष बाळसाहेब भोसले, आदींच्या उपस्थितीत डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. लहूजी शक्ती सेनेच्या वतीने शहराध्यक्ष अमर तडाखे, अनिल सकटे, शिवाजी सगट यांनी बिंदू चौकात डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले. कोल्हापूर जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील, शहराध्यक्ष प्रल्हाद चव्हाण यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या कोल्हापूर चॅप्टरच्या वतीने चेंबरच्या कार्यालयात अभिवादन केले. यावेळी समन्वयक संजय वाघ, अक्षय पाटोळे, विलास कांबळे उपस्थित होते. बालकल्याण संकुलात संस्थेच्या कार्यवाह पद्मजा तिवले यांच्याहस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.



शिवाजी विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना डॉ. देवानंद शिंदे. डावीकडून डॉ. जगन कराडे, डॉ. आर. के. कामत, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. टी. शिर्के आदी.

### हुपरीत लोटला जनसागर

हातकणंगले : हुपरी (ता. हातकणंगले) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त गेल्या साठ वर्षांपासून श्रद्धापूर्वक जपणूक केलेल्या अस्थी शुक्रवारी खुल्या करून दर्शनासाठी ठेवल्या. या पवित्र अस्थींच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह अनेक ठिकाणांहून मोठ्या संख्येने जनसागर लोटला होता. रात्री उशिरापर्यंत लाखो जनसमुदायांने शिस्तबद्धरितीने भावपूर्ण वातावरणात आदरांजली वाहून सामुदायिकरीत्या अभिवादन केले.



कोल्हापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. जगन कराडे, प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी.

# डॉ. आंबेडकर यांचे सर्व क्षेत्रांतील कार्य सर्वसमावेशक : कुलगुरू शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध ३६ क्षेत्रांशी संबंधित केलेले कार्य हे सर्वसमावेशक आहे. त्यांच्या विचारातील प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेबांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा मूलमंत्र दिला. त्याचे योग्य कालसापेक्ष आकलन करून ते व्यवहारात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६३ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभेत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जातीअंताचा विचार आणि लेखन यातून त्यांनी केलेली तात्त्विक मांडणी आजही मार्गदर्शक आहे. त्यांच्या स्वप्नातील भारत साकारायचा असेल तर तरुणांनी बाबासाहेबांच्या विचारांचा आणि त्यांच्या संविधानाचा आधार घ्यावाच लागेल, अशी मांडणी प्रा. डॉ. जगन कराडे यांनी केली.

प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी भारताची सध्याची आर्थिक परिस्थिती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचारांचे आजच्या स्थिती संदर्भातील महत्त्व यांचे सखोल विवेचन केले. जगातील लोकशाही विचाराला मानवी कल्याणाचे भान देण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले, असे मत केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी व्यक्त केले.

सूत्रसंचालन अविनाश भाले यांनी केले. डॉ. श्रीपाल गायकवाड यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आय. क्यू. ए. सी. चे संचालक प्रा. डॉ. आर. के. कामत, प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. पी. डी. पाटील, कास्ट्राईब संघटनेचे महाराष्ट्र राज्यसंघटक आनंद खामकर उपस्थित होते.

# विद्यापीठात आज स्पर्धा परीक्षेसंदर्भात व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे शनिवार (दि.७) सकाळी ११ वाजता अर्थशास्त्र विभागाच्या स्मार्ट क्लासरूममध्ये औरंगाबादचे उपायुक्त (जीएसटी) रवींद्र जोगदंड यांचे 'स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. प्र-कुलगुरू, डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव, डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठाची विजयी घोडदौड

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भोपाळ (मध्य प्रदेश) येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने शुक्रवार, दि. ६ रोजी झालेल्या सामन्यात इंदोरच्या देवी अहिल्या विद्यापीठाचा २ - १ गोलने पराभव केला. शिवाजी विद्यापीठाचा हा तिसरा विजय असून, यापूर्वीच्या पहिल्या सामन्यात आर. के विद्यापीठ, राजकोटचा १० - ० गोलने, तर दुसऱ्या अटीतटीच्या सामन्यात गुजरातच्या गांधीनगर क्रीडा विद्यापीठाचा २ - १ ने पराभव केला.

शुक्रवारी झालेल्या चुरशीच्या सामन्यात पूर्वार्धात २० व्या मिनिटाला इंदोरकडून विश्वप्रताप भाटी याने पहिल्या गोलची नोंद केली. शिवाजी संघ पहिल्यापासूनच वरचढ वाटत असतानाच झालेल्या गोलमुळे संघ दडपणात आला. काही वेळातच कर्णधार राहुल पाटील, प्रतीक बदामे, प्रथमेश हेरेकर, हांडे, दिग्विजय सुतार यांनी खेळात सुसूत्रता आणून खेळात आक्रमता आणली. सामन्याच्या २८ व्या मिनिटाला इंदोरच्या बचाव फळीतील खेळाडूच्या हाताला डी एरियात चेंडू लागल्याने शिवाजी विद्यापीठाच्या संघाला पेनल्टी देण्यात आली. आरबाज पेंढारीने पेनल्टीद्वारा गोल करून सामना १ - १ असा बरोबरीत आणला. सामन्याच्या उत्तरार्धात डाव्या बगलेतून बदामेच्या मिळालेल्या पासवर प्रथमेश हेरेकरने गोल करून सामन्यात आघाडी मिळवून दिली. अखेर याच गोलफरकावर शिवाजी विद्यापीठाने सामना जिंकला. शनिवारी गटातील शिवाजी विद्यापीठाचा उपांत्य सामना डॉ. एच. एस. गौर विद्यापीठ, सागर (मध्य प्रदेश) या संघाबरोबर



**भोपाळ : पश्चिम विभागीय पुरुष फुटबॉल स्पर्धेत सहभागी झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.**

# समाजशास्त्र विभागात मंगळवारी आंतरराष्ट्रीय परिषद

## सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातर्फे विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या औचित्य साधून १० ते १२ डिसेंबर या कालावधीत आंतरराष्ट्रीय परिषदेचे अयोजन करण्यात आले आहे. परिषदेचे उद्घाटन मंगळवार, दि. १० डिसेंबर रोजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये सकाळी १०.३० वाजता होणार असून 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी' या मध्यवर्ती विषयावर ही परिषद होत आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, परिषदेचे उद्घाटन ज्येष्ठ संशोधक आणि मानवी हक्क कार्यकर्त्या प्रा. गेल ऑम्वेट यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोग आणि भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांचे बीजभाषण होणार आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. या परिषदेचे संचालक, समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. जगन कराडे हे आहेत. या सोहळ्यासाठी ज्येष्ठ संशोधक डॉ. उत्तमराव भोईटे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, भारतीय समाजशास्त्र परिषदेच्या अध्यक्षा प्रा. आर. इंदिरा, सचिव डी. आर. साहू, सामाजिक शास्त्र विभागाच्या अधिष्ठाता प्रा. भारती पाटील, शास्त्र विभागाचे अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत.



समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. जगन कराडे म्हणाले, या परिषदेत १५ ते १६ देशांतील विचारवंत, प्राध्यापक, संशोधक उपस्थित राहून आपले विचार मांडणार आहेत. तीन दिवसांत १८ सत्रांमध्ये होणाऱ्या परिषदेत भारतासह १५ देशांतील विविध विद्यापीठांतील ७० विद्वान आणि विविध विद्यापीठांचे ८ माजी कुलगुरू सहभागी होत आहेत.

परिषदेदरम्यान ९० पेक्षा अधिक शोधनिबंधांचे सादरीकरण आणि यावरील चर्चा होणार आहे. विशेषतः 'प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान', भारतीय समाजशास्त्राच्या अध्ययन आणि अध्यापनास या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय समाजशास्त्राचा शंभर वर्षांचा प्रवास, यांवर विशेष व्याख्याने आणि परिषदेस काही कारणांनी ज्यांना उपस्थित राहता येत नाही, अशांसाठी विद्यापीठात पहिल्यांदाच ई - सेशनही होणार असून, यामध्ये परदेशी विद्वान सहभागी होणार आहेत.

परिषदेचा समारोप १२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून, बिहारमधील मोतीहार येथील महात्मा गांधी केंद्रीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. अरविंद अग्रवाल हे प्रमुख पाहुणे असणार आहेत. अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्केअसणार आहेत. यावेळी डॉ. पी. डी. राऊत आणि प्रा. ए. एम. गुरव उपस्थित असणार आहेत. पत्रकार परिषदेला प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित होते.

# ‘स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना’ विद्यापीठात आज व्याख्यान

टेंबलाईवाडी, ता. ६ : शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने ‘स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना’ या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन केले आहे. हे व्याख्यान शनिवारी (ता. ७) सकाळी ११ वाजता अर्थशास्त्र विभागाच्या स्मार्ट क्लासरुममध्ये होणार आहे. यामध्ये औरंगाबादचे उपायुक्त (जीएसटी) रवींद्र जोगदंड (आयआरएस) व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव, डॉ. व्ही.डी. नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असेल. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

# सशस्त्र सेना ध्वजदिनानिमित्त आज विद्यापीठात स्पर्धा, पथनाट्य

टेंबलाईवाडी, ता. ६ : शिवाजी विद्यापीठ, छत्रपती संभाजीराजे फौंडेशन आणि शहीद जवान स्फूर्ती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता. ७) सशस्त्र सेना ध्वज दिन होणार आहे. सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळा सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी विविध स्पर्धांतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण, पथनाट्य, गीत गायन यांचे सादरीकरणही होणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

छत्रपती संभाजीराजे फौंडेशनतर्फे दरवर्षी या दिवशी विविध उपक्रम केले जातात. यावर्षी शिवाजी विद्यापीठ, शहीद जवान स्फूर्ती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा दिवस होणार आहे. या निमित्ताने शाळांमधून गीत गायन, पथनाट्य, वक्तृत्व, चित्रकला अशा विविध स्पर्धा झाल्या. यातील विजेत्यांना शनिवारी (ता. ७) होणाऱ्या सशस्त्र सेना ध्वज दिनादिवशी पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला सकाळी १० वाजता सुरुवात होईल. पत्रकार परिषदेत छत्रपती संभाजीराजे फौंडेशनचे शहाजी माळी यांनी फौंडेशनच्या कामाची माहिती दिली. यावेळी डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. के. गायकवाड, उदय घोरपडे, अलका भगवान, युवराज उलपे, अमर पाटील, आशिष बेडेकर, पूनम गायकवाड हे उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे अनुकरण काळाची गरज : डॉ. शिंदे

कोल्हापूर, ता. ६ : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध क्षेत्राशी संबधित केलेले कार्य हे सर्वसमावेशक आहे. त्यांच्या विचारातील प्रत्यक्ष अमलबजावणी होणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेबांनी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र दिला. त्याचे योग्य कालसापेक्ष आकलन करून ते व्यवहारात आणणे हिच त्यांना खरी आदरांजली ठरेल,' असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विध्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत साकारायचा असेल तर तरुणांनी बाबासाहेबांच्या विचारांचा आणि त्यांच्या संविधानाचा आधार घ्यावाच लागेल, अशी मांडणी प्रा. डॉ. जगन कराडे यांनी केली. प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे मनोगत झाले.

सूत्रसंचालन श्री. अविनाश भाले यांनी केले. डॉ. श्रीपाल गायकवाड यांनी आभार मांनले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रा. डॉ. आर. के. कामत, प्रा. डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. पी. डी. पाटील, आनंद खामकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2019
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाची विजयी घोडदौड

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धा, मध्य प्रदेश : सलग तिसरा विजय



कोल्हापूर : येथील शिवाजी विद्यापीठाचा फुटबॉल संघ सोबत मध्यभागी प्रशिक्षक डॉ अभिजित वणीरे, व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड

प्रतिनिधी
कोल्हापूर

भोपाळ (मध्यप्रदेश) येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने आपली विजयी घोडदौड कायम ठेवताना शुक्रवारी झालेल्या सामन्यात इंदोरच्या देवी अहिल्या विद्यापीठाचा २-१ गोलने पराभव केला. शिवाजी विद्यापीठाचा हा तिसरा विजय ठरला. यापुर्वीच्या पहिल्या सामन्यात आर. के. विद्यापीठ राजकोटचा १०-० गोलने तर दुसऱ्या अटीतटीच्या सामन्यात गुजरातच्या गांधीनगर क्रीडा विद्यापीठाचा २-१ गोलने ने पराभव केला.

शुक्रवारी झालेल्या चुरशीच्या सामन्यात पुर्वार्धात २० व्या मिनीटाला इंदोरकडून विश्वप्रताप भाटी याने पहिल्या गोलची नोंद केली. शिवाजी संघ पहिल्यापासूनच वरचढ वाटत असतानाच अचानक झालेल्या गोलमुळे दडपणात आला. काही वेळातच कर्णधार राहूल पाटील, प्रतिक बदामे, प्रथमेश हेरेकर, हांडे, दिग्विजय सुतार यांनी खेळात सुसूत्रता आणून आक्रमण वाढवले. सामन्याच्या २८ व्या मिनीटाला इंदोरच्या बचावफळीतील खेळाडूच्या हाताला डी एरीयात चेंडू लागल्याने शिवाजी संघाला पेनल्टी देण्यात आली. आरबाज पेंढारीने पेनल्टीद्वारा गोल करुन सामना बरोबरीत आणला.

उत्तरार्धात डाव्या बगलेतून बदामेच्या मिळालेल्या पासवर प्रथमेश हेरेकरने गोल करुन सामन्यात आघाडी मिळवून दिली. अखेर याच गोलफरकावर शिवाजी विद्यापीठाने सामना जिंकला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2019
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात मंगळवारपासून आंतरराष्ट्रीय समाजशास्त्र परिषद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून विद्यापीठाच्यावतीने तीनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. 'समाज : पुनर्रचना, प्रतिक्रिया आणि जबाबदारी' या विषयावर ही परिषद होणार आहे. ज्येष्ठ संशोधक आणि मानवी हक्क कार्यकर्त्या प्रा. गेल ऑम्वेट यांच्या हस्ते मंगळवारी (१० डिसेंबर) रोजी सकाळी १० वाजता परिषदेचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. तीन दिवसांमध्ये एकूण १८ सत्रांमध्ये ही परिषद होणार आहे. भारतासह १५ देशांतील विविध विद्यापीठातील ७० तज्ज्ञांचा समावेश असणार आहे. परिषदेदरम्यान ९० पेक्षा अधिक शोधनिबंधांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. प्रा. डॉ. विलास संगवे स्मृतिव्याख्यान, भारतीय समाजशास्त्राच्या अध्ययन आणि अध्यापनास यावर्षी शंभर वर्षे होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय समाजशास्त्राचा शंभर वर्षाचा प्रवास यावर विशेष व्याख्यान होणार आहे.



- समाजशास्त्र विभागाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष
- १५ देशांतील तब्बल ७० तज्ज्ञांचा सहभाग

परिषदेचा समारोप गुरूवार १२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. बिहारमधील मोतिहारी येथील महात्मा गांधी केंद्रीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. अरविंद अग्रवाल हे प्रमुख उपस्थित असणार आहेत. भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे संचालक प्रा. उपेंद्र चौधरी, प्रा. अजय गुप्ता, हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, आंतरविद्या विभागाचे प्रा. पी. डी. राउत, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे प्रा. ए. एम. गुरव उपस्थित असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 DEC 2019
तरुण भारत

# सशस्त्र सेना दिनानिमित्त विविध स्पर्धा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

- प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती
- आज विद्यापीठ परिसरात सशस्त्र सेना ध्वज दिन कार्यक्रम

देशभर ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वज दिन म्हणून साजरा केला जातो. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ, छत्रपती संभाजीराजे फौंडेशन आणि शहीद जवान स्फूर्ती केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार ७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठ परिसरात खासदार संभाजीराजे छत्रपती व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या उपस्थितीत सशस्त्र सेना ध्वज कार्यक्रमाचे आयोजन केले आहे, अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, देशात ३३ लाख माजी सैनिक आहेत. तर साडेसहा लाख वीरपत्नी असून, दरवर्षी ६० हजार सैनिक निवृत्त होत आहेत. त्यांच्यासाठी कृतज्ञता दिवस म्हणून सशस्त्र सेना ध्वज दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमात एनएसएस व एनसीसीचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गीत गायन, पथनाट्य, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसाठी बेळगावच्या मराठा लाईट इन्फन्ट्रीच्या रेजिमेंटल सेंटरला सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीराजे फौंडेशनचे अध्यक्ष शहाजी माळी म्हणाले, केंद्र सरकार सैनिकांच्या कल्याणासाठी जो निधी देत आहे, तो पुरेसा नाही. त्यामुळे सैनिकांसाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी भारत सरकार संरक्षण मंत्रालय बँक खाते क्रमांक ३०८३०००१००१७९८७५ पंजाब नॅशनल बँक या खात्यावर मदतनिधी जमा करावा.